(१०)

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे ४

सर्व्हे नं.८३२ अ, फायनल प्लाट क्र.१७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११००४

फोन नं.०२०-०२५७०५००० फॅक्स नं-०२५७०५१२२/२५६६५८०७

क्र.रा.मं./पापुई-५/चि.का./ ४३९
पुणे ४११ ००४.
दिनांक : २९/०५/२०१५

प्रति,
विभागीय सचिव
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर
अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर
अमरावती/नाशिक/लातूर/कोकण .

विषय - इ.११वी व इ.१२वी "चिटणीसाची कार्यपध्दती" या विषयाशी संबंधित 'कंपनी कायदा २०१३' बाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, इ.११वी व इ.१२वी "चिटणीसाची कार्यपध्दती" या विषयाची प्रचलित पाठ्यपुस्तके 'कंपनी कायदा १९५६' व त्यानंतरच्या सुधारीत कायद्यांमधील तरतुदींनुसार तयार करण्यात आली आहेत. नवीन 'कंपनी कायदा २०१३' स्विकृत केल्याने त्यामध्ये 'कंपनी कायदा १९५६' मधील तरतुदींमध्ये काही बदल करण्यात आले आहेत, काही तरतुदी नव्याने करण्यात आल्या आहेत तर काही तरतुदी वगळण्यात आल्या आहेत. त्यानुसार कायद्यातील कलम क्रमांकामध्येही बदल झालेला आहे.

प्रचलित पाठ्यपुस्तकामध्ये तूर्त कोणतेही बदल केलेले नसल्याने, विषयाशी संबंधित शिक्षकांनी या बदलाची नोंद घेऊन या कायद्याचा सखोल अभ्यास करावा व विद्यार्थ्यांपर्यंत आवश्यक बदल पोहोचवावेत. यासाठी परिपत्रक तयार करण्यात आले असून ते आपणांस यासोबत देण्यात येत आहे. त्याच्या आवश्यक छायाप्रती काढून आपल्या कार्यक्षेत्रातील वाणिज्य शाखेच्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना तातडीने पाठविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्यमंडळास सादर करावा.

सचिव
राज्यमंडळ, पुणे ४.

महत्वाचे
कालमर्यादित

क्रमांक/नाविमं/उमा/अ-२
नाशिक ४२२ ००१
दिनांक-१६/०६/२०१५

प्रति,
प्राचार्य,
सर्व मंडळ मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार जिल्हे.

सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, उपरोक्त राज्य मंडळाचे पत्रानुसार कार्यवाही करण्यात यावी,तसेच सदर बाब संबंधित शिक्षक व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी.

(आर.आर.मारवाडी)
विभागीय सचिव,

परिपत्रक क्र. रा.मं./पापुई–५/चि.का./कंपनी कायदा–२०१३/३१२ दि.२९/५/२०१५

**विषय : इ.११ वी व १२ वी चिटणिसाची कार्यपद्धती या विषयाशी संबंधीत 'कंपनी कायदा २०१३' मध्ये झालेल्या बदलांबाबत.**

या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, इयत्ता ११ वी व १२ वी चिटणिसाची कार्यपद्धती या विषयाची पाठ्यपुस्तके 'कंपनी कायदा १९५६' व त्यानंतरच्या सुधारित कायद्यांमधील तरतुदींनुसार तयार करण्यात आली होती. नवीन 'कंपनी कायदा, २०१३' स्विकृत केल्याने त्यानुसार 'कंपनी कायदा, १९५६' मधील तरतुदींमध्ये बदल करण्यात आले आहेत. काही तरतुदी नव्याने करण्यात आल्या असून 'कंपनी कायदा १९५६' मधील काही तरतुदी वगळण्यात आल्या आहेत. त्यानुसार कायद्यातील कलम क्रमांकामध्येही बदल झालेला आहे. त्यामुळे शिक्षकांनी या सर्व बाबींची नोंद घेणे आवश्यक असल्याने या विषयाच्या सर्व संबंधित शिक्षकांनी सदर कायद्याचा सखोल अभ्यास करावा व विद्यार्थ्यांपर्यंत आवश्यक बदल पोहोचवावेत. इ.११ वी व १२ वीच्या पाठ्यपुस्तकांत तूर्त कोणताही बदल केलेला नसल्याने यासंदर्भात शिक्षकांनी या बदलानुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. आपल्या माहितीसाठी अभ्यासक्रमाशी संबंधित काही बदल खालीलप्रमाणे आहेत.

## इंग्रजी माध्यम

**The Companies Act, 2013 has 470 sections and seven schedules as against 658 sections and 15 schedules in the Companies Act, 1956. Some important sections of Companies Act, 2013 related with Std. XI and XII syllabus are:**

**STD. XI**

1. Definition of 'Company' - Section 2(20)
   'Company' means a company incorporated under the Companies Act, 2013 or under any previous company law.
2. Definition of 'Memorandum of Association' - Section 2(56)
3. Definition of 'Articles of Association' - Section 2(5)
4. Table F (instead of Table A) Articles of Association of company limited by shares (91 articles)
5. Definition of 'Prospectus' - Section 2(70)
   "Any document described or issued as a prospectus and includes a red herring prospectus referred to in Section 32 or shelf prospectus referred to in Section 31 or any notice, advertisement or other document inviting offers from the public for subscription or purchase of any securities of a body corporate."
   'Shelf Prospectus' means a prospectus in respect of which the securities or class of securities included therein are issued for subscription in one or more issues over a certain period without the issue of a further prospectus. (Validity period one year)
   'Red Herring Prospectus' means a prospectus which does not include complete particulars of the quantum or price of the securities included therein.
6. Board of Directors - Section 149 to 169. Mandatory for prescribed classes of companies to have at least one woman director (Sec. 149). Participation of directors in board meetings

by video conferencing or by electronic means. (Sec. 154). Such participation shall count for quorum purposes. (Sec. 173)

7. Board Meetings - Section 173 to 175
8. Annual General Meeting - Section 96 to 98
    - First Annual General Meeting within 9 months from the date of closing first financial year.
9. Quorum for general meeting - Section 103
    - Private Company - 2 members personally present
    - Public Company -

| Members to be personally present | Numbers of members |
|---|---|
| 5 | Upto 1000 |
| 15 | 1000 to 5000 |
| 30 | More than 5000 |

10. Extra ordinary general meeting - Section 100
11. Notice - Section 101
12. Chairman - Section 104
13. Proxy - Section 105
14. Voting by show of hands - Section 107
15. Voting through electronic means - Section 108
16. Demand for poll - Section 109
17. Postal Ballot - Section 110
18. Circulation of Members' resolution - Section 111
19. Ordinary and special resolution - Section 114
20. Resolution requiring special notice - Section 115
21. Minutes - Section 118, 119
22. Managing Director - Section 196
23. Maximum remuneration - Section 197
24. Functions of company secretary - Section 205
25. NCLT - Section 407 to 434

**STD. XII**

1. Definition of 'Share' - Section 2(84)
2. Definition of 'Debenture' - Section 2(30)
3. Definition of 'Deposit' - Section 2(31)
4. Share certificate to be issued within 2 months after allotment and within 1 month after transfer or transmission.
5. Preference shares - Only 7 types. Irredeemable preference shares is not there.
6. Issue of shares at discount - A company shall not issue shares at discount, except the issue of sweat equity shares under section 54.
7. Issue of bonus shares - Section 63
8. Public offer and private placement - Section 23
9. Allotment of Shares - Section 39
10. Kinds of share capital - Section 43
11. Issue at premium - Section 52
12. Issue at discount - Section 53
13. Sweat equity shares - Section 54
14. Transfer & transmission - Section 56
15. Right issue - Section 62
16. Deposits - Section 73 to 76
17. Dividend - Section 123 to 127

'कंपनी कायदा १९५६' मधील कलम ६५८, परिशिष्ठ १५ च्या ऐवजी नवीन 'कंपनी कायदा २०१३' मध्ये ४७० कलमे आणि ७ परिशिष्ठे आहेत. 'कंपनी कायदा २०१३' मधील इ.११ वी व १२ वी च्या अभ्यासक्रमासंदर्भातील बदल पुढीलप्रमाणे:-

**इ.११ वी -**

१. कंपनी व्याख्या: कलम २(२०) नुसार
"कंपनी म्हणजे कंपनी कायदा २०१३ नुसार नोंदलेली किंवा पूर्वीच्या कोणत्याही कायद्यानुसार स्थापन झालेली."
२. "घटनात्मक" व्याख्या: कलम २(५६) नुसार
३. "नियमावली" ची व्याख्या: कलम २(५) नुसार
४. सारणी "अ" च्या ऐवजी सारणी "फ" भागानी मर्यादित असलेल्या कंपनीच्या नियमावलीत (९१) नियमांचा समावेश.
५. "माहितीपत्रक" व्याख्या: कलम २(७०) नुसार
६. संचालक मंडळ - कलम १४९ ते १६९ नुसार.
कंपनीच्या संचालक मंडळामध्ये किमान <u>एक</u> महिला संचालक आवश्यक आहे. कलम (१४९)
संचालक मंडळाच्या सभेमध्ये संचालकाचा सहभाग हा दृकश्राव्य माध्यम किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे ग्राह्य धरला जातो. कलम (१५४). हा सहभाग किमान गणसंख्येसाठी ग्राह्य धरला जातो.
७. संचालक मंडळ सभा. कलम १७३ ते १७५.
८. वार्षिक सर्वसाधारण सभा - कलम ९६ ते ९८ नुसार पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा पहिले आर्थिक वर्ष संपल्यापासून <u>नऊ</u> महिन्यांच्या आत घेण्यात यावी.
९. सर्वसाधारण सभेसाठी गणसंख्या कलम १०३ नुसार -
खाजगी कंपनी - किमान <u>दोन</u> सभासद व्यक्तिशः हजर असणे आवश्यक.
सार्वजनिक कंपनीसाठी खालीलप्रमाणे -

| सभेसाठी किमान व्यक्तिशः उपस्थिती | सभासद संख्या |
|---|---|
| ५ सभासद | १००० पर्यंत |
| १५ सभासद | १००० ते ५००० |
| ३० सभासद | ५००० पेक्षा जास्त |

१०. विशेष सर्वसाधारण सभा - कलम १००
११. सूचना - कलम १०१
१२. अध्यक्ष - कलम १०४
१३. प्रतिनिधी - कलम १०५
१४. हात उंच करून मतदान - कलम १०७
१५. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान - कलम १०८
१६. मतनोंदणी पद्धतीची मागणी - कलम १०९
१७. टपालाद्वारे मतदान - कलम ११०
१८. परिपत्रकाद्वारे सभासदांचा ठराव - कलम १११

१९. साधा ठराव व विशेष ठराव – कलम ११४
२०. विशेष सूचनेची आवश्यकता असणारा ठराव – कलम ११५
२१. इतिवृत्त – कलम ११८, ११९
२२. कार्यकारी संचालक – कलम १९६
२३. जास्तीत जास्त मानधन – कलम १९७
२४. कंपनी चिटणिसाची कार्ये – कलम २०५
२५. राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद मंडळ – कलम ४०७ ते ४३४

**इ.१२ वी**

१. "भाग" व्याख्या – कलम २(८४)
२. "कर्जरोखे" व्याख्या – कलम २(३०)
३. "ठेवी" व्याख्या – कलम २(३१)
४. भाग प्रमाणपत्राचे वाटप भागाचे वाटप केल्यापासून दोन महिन्यांच्या नंतर आणि भागाचे संक्रमण किंवा हस्तांतर झाल्यानंतर एक महिन्यात करण्यात यावे.
५. अग्रहक्क भाग फक्त सात प्रकार अभ्यासावे व परतफेड न केले जाणारे अग्रहक्क भाग वगळण्यात आले आहेत.
६. कसर देऊन भागाची विक्री – कसर देऊन भागाची विक्री कंपनीस करता येणार नाही, याला अपवाद – प्रस्वेदन (SWEAT) समहक्क भाग आहेत. कलम ५४ नुसार.
७. बोनस भागाचे वाटप – कलम ६३
८. भागाची सार्वजनिक विक्री व खाजगीरित्या विक्री – कलम २३
९. भाग वाटप – कलम ३९
१०. भाग भांडवलाचे प्रकार – कलम ४३
११. वाठावा (अधिमूल्याने) घेऊन भागाची विक्री – कलम ५२
१२. कसर देऊन भागाची विक्री – कलम ५३
१३. प्रस्वेदन (SWEAT) समहक्क भाग – कलम ५४
१४. भाग हस्तांतरण आणि भाग संक्रमण – कलम ५६
१५. हक्क भाग – कलम ६२
१६. ठेवी – कलम ७३ ते ७६
१७. लाभांश – कलम १२३ ते १२७

तरी उपरोक्तप्रमाणे ही बाब शिक्षक, विद्यार्थी यांचे निदर्शनास आणून द्यावी. तसेच सदर परिपत्रक कनिष्ठ महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावून कार्यवाही करावी.

ठिकाण : पुणे – ४११ ००४
दिनांक : २९ मे, २०१५

सचिव,
महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे – ४११ ००४